पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ३

**सभावृत्तांत**

दिनांक - **०१/०६/२०१८** वेळ - सकाळी **११.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **०१/०६/२०१८** रोजी सकाळी **११.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई - सभापती
२. मा.पवार मनिषा प्रमोद
३. मा.उषा ऊर्फ माई मनोहर ढोरे
४. मा.कदम निकिता अर्जुन
५. मा.अड.सचिन सुरेश भोसले

या शिवाय मा.डोईफोडे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.४) प्रभाग क्र.३४ गव्हाणेवस्तीमध्ये अग्निशामक कैंद्रासमोरील जुने संडासब्लॉक पाडून नविन संडासब्लॉक बांधणेबाबत – मा.उषा ढोरे, मा.मनिषा पवार यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) माजी महापौर आर.एस.कुमार महापौर चषक राज्यस्तर फुटबॉल स्पर्धा २०१८ बाबत.

----------

दिनांक १८/०५/२०१८ व २५/०५/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**----------**

ठराव क्रमांक - ०९ विषय क्रमांक - ०१
दिनांक - ०१/०६/२०१८ विभाग – प्रशासन
सुचक : मा.उषा ढोरे अनुमोदक : मा.सचिन भोसले
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/३३४/२०१८, दि.३१/०३/२०१८

विषय – "ऍनेस्थिशियालॉजिस्ट (भूलतज्ञ)" अभिनामाचे पद सरळसेवा प्रवेशाने भरणेकामी कर्मचारी निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांना नियुक्ती देणेस मान्यता मिळणेबाबत.

विषय क्रमांक ०१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १० विषय क्रमांक - ०२
दिनांक - ०१/०६/२०१८ विभाग – प्रशासन
सुचक : मा.मनिषा पवार अनुमोदक : मा.निकिता कदम
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/३३५/२०१८, दि.३१/०३/२०१८

विषय – "स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र तज्ञ" अभिनामाचे पद सरळसेवा प्रवेशाने भरणेकामी कर्मचारी निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांना नियुक्ती देणेस मान्यता मिळणेबाबत.

विषय क्रमांक ०२ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सवानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ११ विषय क्रमांक - ०३
दिनांक - २५/०५/२०१८ विभाग – विद्युत मुख्यालय
सुचक : मा.सचिन भोसले अनुमोदक : मा.उषा ढोरे
संदर्भ – मा.सह शहर अभियंता (वि/यां) यांचे पत्र क्र.मुका/वि/जा/३२/२०१८, दि.१८/०४/२०१८

विषय – "क" क्षेत्रीय कार्यालयांतर्गत नविन प्रभाग क्र.८ येथील नव्याने होणा-या राष्ट्रीय स्केटींग मैदानासाठी अडथळा ठरत असलेल्या उच्चदाब वाहिन्या भुमिगत करणे.

मा.सह शहर अभियंता (वि/यां) यांचेकडील क्र.कक्षेका/वि/जा/२७०/२०१८, दि.०१/०६/२०१८ चे विनंती पत्रानुसार विषय क्रमांक ०३ चे विषयपत्र मागे घेण्यास परवानगी देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - १२ विषय क्रमांक - ०४
दिनांक - ०१/०६/२०१८
सुचक : मा.उषा ढोरे अनुमोदक : मा.मनिषा पवार
संदर्भ – मा.उषा ढोरे, मा.मनिषा पवार यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.३४ गव्हाणेवस्ती मध्ये अग्निशामक केंद्रासमोरील जुने संडासब्लॉक पाडून नविन संडासब्लॉक बांधणे (निविदा क्र.३७/१०-२०१६-१७) कामास स्थानिक नागरिक व नगरसदस्य यांनी विरोध केलेला आहे. त्यामुळे सदर ठिकाणी काम करता येणार नाही. सदर कामा ऐवजी खंडोबामाळ येथील मनपाच्या पंपिंग स्टेशन परिसरात दलदलीमध्ये भराव करुन सपाटीकरण करणे तसेच रामनगर हौसिंग सोसायटी पाठीमागील पाईपावर भराव करणे व इतर स्थापत्य विषयक कामे करण्याच्या अनुषंगाने प्रस्तुत कामास र.रु.२५ लक्ष एवढया रकमेस सुधारित प्रशासकीय मान्यता व जागा बदलीचा प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १३ विषय क्रमांक - ०५

दिनांक - २५/०५/२०१८ विभाग – अ क्षेत्रीय स्थापत्य

सुचक : मा.उषा ढोरे अनुमोदक : मा.मनिषा पवार

संदर्भ – मा.अति.आयुक्त, यांचे पत्र जाक्र.अक्षे/स्था/कावि/४५५/२०१८, दि.०१/०६/२०१८

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

माजी महापौर आर.एस.कुमार महापौर चषक राज्यस्तर फुटबॉल स्पर्धा दि.१५/०४/२०१८ ते २२/०४/२०१८ चे दरम्यान कै.सदाशिव बहिरवाडे क्रिडांगण शाहुनगर येथे होणार आहे. सदरील क्रिडांगण अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत येत असून सद्यपरिस्थितीत स्थापत्य विभागात मंडप विषयक कुठलेही प्रकारचे काम सुरु नसून सदरील माजी महापौर आर.एस.कुमार महापौर चषक राज्यस्तर फुटबॉल स्पर्धेत मंडप विषयक काम करणेबाबत मा.अतिरिक्त आयुक्त व मा.सहाय्यक आयुक्त क्रीडा यांनी दि.०९/०४/२०१८ रोजीच्या पत्रान्वये सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच मा.स्थायी समिती ठराव क्रमांक २४८३, दि.२१/०३/२०१८ रोजी सदरील काम करणेस मान्यता देण्यात आली आहे. सद्यस्थितीत प्रभाग क्र.२४ (प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह) मध्ये विविध कार्यक्रमांकरिता मंडप व्यवस्था करणे (निविदा क्र.१८/६२-२०१६ - १७) हे काम ४५% पुर्ण झाले आहे. प्रा.रामकृष्ण मोरे सभागृह येथे सद्यस्थितीत नुतनीकरणाची कामे सुरु असले कारणाने सदर ठिकाणी मंडप व्यवस्थेच्या कामाची आवश्यकता भासणार नाही. सदरील कामातून माजी महापौर आर.एस.कुमार महापौर चषक राज्यस्तर फुटबॉल स्पर्धेचे काम करता येणे शक्य आहे. तरी सदरील कामातून प्रभाग क्र.१० मधील मंडप विषयक काम करणे व माजी महापौर आर.एस.कुमार महापौर चषक राज्यस्तर फुटबॉल स्पर्धा यांची मंडप विषयक कामे करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई)**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३२८/२०१८
दिनांक : ०१/०६/२०१८



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.